# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेलः arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र. आरक्षण/ओ-२२/७६० दिनांक :२२/०६/२०१३

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युतर स्तरावर विशेष अभ्यासक्रमास प्रवेश देतांना आरक्षण धोरणांची अंमलबजावणी करणेबाबत.**
**संदर्भः- परिपत्रक क्र.-सकआ/शिक्षण/आरक्षण/१३-१४/१६८६, दि.- १३/०६/२०१३.**

महोदय/महोदया,

महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युतर स्तरावर विशेष अभ्यासक्रमामध्ये प्रवेश देतांना आरक्षणाचे तत्व पाळण्याबाबत मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- १ यांनी दिनांक १३/०६/२०१३ रोजी परिपत्रक निर्गमीत केलेले आहे. सोबत परिपत्रकाची प्रत जोडत आहे.

याबाबत प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, सदर परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे पदव व पदव्युतर स्तरावर विशेष अभ्यासक्रमास प्रवेश देतांना आरक्षण धोरणाचे नियमानुसार पालन करणे आवश्यक असुन महाविद्यालयांमध्ये/संस्थांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या आरक्षण धोरणानुसार प्रवेश प्रक्रिया करताना आरक्षण धोरणांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

२२/६/१३

उपकुलसचिव
( आरक्षण कक्ष )

सोबतः- परिपत्रक क्र.-सकआ/शिक्षण/आरक्षण/१३-१४/१६८६, दि.- १३/०६/२०१३ ची प्रत.

G:\pk 2013\Circulars.docx

परिपत्रक

क्रं.सकआ/शिक्षण/आरक्षण/१३-१४/१६८६

**समाज कल्याण आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.**
दिनांक : १३ जून, २०१३.

विषय : **अकृषि विद्यापीठे तसेच संलग्नीत अशासकीय महाविद्यालयांमध्ये संवर्गवार व विषयवार आरक्षण ठेवण्याबाबत..**
**पदवी व पदव्युत्तर स्तरावर विशेष अभ्यासक्रमामध्ये प्रवेश देतांना आरक्षणाचे तत्व पाळणेबाबत**

संदर्भ : महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, निर्णयक्रं.एनजीसी-१४९४/(२९९१)/विशि-४, दि. २४ एप्रिल, १९९५.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, अकृषि विद्यापीठे तसेच संलग्नीत अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण शास्त्र इत्यादी महाविद्यालयातील **अधिव्याख्याता** पदासाठी संवर्गवार व विषयवार **आरक्षण** देण्यात आलेले आहे.

या आयुक्तालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर स्तरावर विशेष अभ्यासक्रमात अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना नियमानुसार प्रवेश देण्यास टाळाटाळ करण्यात येते. त्यामुळे, विषयनिहाय शिक्षकांची नियुक्ती करतांना पुरेसे मागासवर्गीय शिक्षक उपलब्ध होऊ शकत नाहीत.

यामुळे, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विशेष अभ्यासक्रमाला प्रवेश देतांना **आरक्षण धोरणाचे नियमानुसार पालन करणे अनिवार्य आहे.**

तरी, **सदर आरक्षण धोरणाची अंमलबजावणी न करणाऱ्या महाविद्यालयांना व संबंधित संस्थांना जबाबदार धरुन त्यांचेवर नियमानुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

१३/६/२०१३

**आयुक्त, समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत :

१. मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३. कुलसचिव, सर्व विद्यापीठे.
४. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण) (सर्व)
६. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)